**प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ यांचा शपथेवर उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.देशमुख यांच्यातर्फे सुरू:-**

या दाव्याच्या कामी मी भाग्यश्रीने एकत्रीत म्हणणे दाखल केलेले होते. आम्ही दोघींनी वेगवेगळे वकील नेमलेले आहेत. आम्ही दोघीजणी वेगवेगळे शपथपत्र देणार आहोत. मी वडिलांचे सर्विस बुक दाखल करू शकते. मी आज सर्विस बुकचे झेरॉक्स प्रती माझ्यासोबत घेऊन आलेले आहे. मी यापूर्वी वडिलांच्या सर्विस बुकची प्रमाणित प्रत या दाव्याच्या कामी दाखल केली नाही. नि.क्र.८० च्या यादीसोबत असणारी बंडाप्पा यांच्या सर्विस बुकची प्रमाणित प्रत मला दाखविली, ती प्रमाणित प्रत तीच आहे, त्याला **नि.क्र.८१**. त्यामध्ये शैक्षणिक पात्रता ९वी पास नमूद केली आहे. शरणम्माच्या सर्विस बुकची प्रमाणित प्रत आता मला दाखविली, ती आता मला दाखवली, तिला **नि.क्र.८२**. ती सर्विस बुक तीच आहे का काय मला माहीत नाही. एखाद्या शिक्षकाच्या सर्विस बुकमध्ये असणाऱ्या त्यांच्या नावावरुन ती ओळखली जाते. नि.क्र.८२ ची सर्विस बुक मला दाखवली, ती शरणम्मा यांच्या नावाची आहे. त्यामध्ये त्यांची शैक्षणिक पात्रता १२वी पास असे नमूद आहे. बंडप्पा हे नोकरी निमित्त बाहेरगावी राहात असत. मी त्यांच्या बाहेरगावी राहाण्याचा कालावधी नक्की सांगू शकत नाही. माझ्या जन्मानंतर ते जळकोट येथे राहात होते. बंडप्पा

निवृत्त होईपर्यंत बाहेरगावी राहात होते. ते नेमणुकीच्या ठिकाणी राहायला असत. बंडेप्पाच्या पगारात भागत नव्हते त्यामुळे शरणम्मा नोकरी करत होती.

बंडेप्पाची शारीरिक व मानसिक स्थिती बिघडलेली असताना वादींनी त्याच्याकडून कोर्टातून जमिन लिहून घेतली त्याबाबत कोणतेही वैद्यकीय कागदपत्र माझ्याकडे उपलब्ध नाहीत. बंडेप्पाची मानसिक व शारीरिक परिस्थिती बिघडल्याचे कागदपत्र मी या दाव्याच्या कामी दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमीन सर्वे क्र.२१६/२, २१७/२ व ३४/ब/२ हे शरणम्माने स्वतःच्या कमाईतून खरेदी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, जमीन सर्वे क्र.३४/ब/२ ही शरणम्माने बंडेप्पाच्या नावे घेतलेली जमीन असल्याने कोर्टातील आदेशाद्वारे बंडप्पाने शरणम्माच्या नावे करून दिली. सन १९८६ साली सर्वे क्र.३४/ब/२ ही या जमिनीचे खरेदीपत्र मी बघितलेले आहे. मला आता त्या खरेदीपत्राचे प्रमाणित प्रत दाखवली, तिला **नि.क्र.८३**. त्या खरेदी पत्रावर असणारे साक्षीदार अशोक शंकर मठपती, वैजनाथ कलप्पा उप्परबावडे त्या दोघांनी मी ओळखते.

दि.३०/१२/२०१५ ला माझ्या वडिलांचा मृत्यू झाला. शरणम्माने व माझ्या भावाने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला नव्हता. भाग्यश्री हिने शरणम्माला किंवा ज्योतिर्लिंगाना न सांगता वारस प्रमाणपत्र

काढले होते. भाग्यश्री शरणम्मा सोबत राहाते. भाग्यश्री लग्नानंतर शरणम्मासोबत राहाते. हे म्हणणे खरे नाही की, भाग्यश्री व तिच्या भावांना शरणम्मा सर्व खर्च देत होती. भाग्यश्री शरणम्माकडे भाड्याने राहात नव्हती. भाग्यश्री आजारी पडायची म्हणून औषधोपचारासाठी ती शरणम्मासोबत राहायची. भाग्यश्रीच्या मेंदुवर परिणाम झाला होता. थोडे दिवस शरणाम्माने भाग्यश्रीच्या दवाखान्याचा खर्च पाहिला नंतर नाही. भाग्यश्रीची तब्बेत आता चांगली आहे.

वारसा प्रमाणपत्र क्र.४९१/२०१६ च्या आधारावर आम्ही शरणम्माच्या जमिनीला वारस म्हणून नाव लागावे म्हणून अर्ज केला नव्हता.

**न्यायालयाचा कार्यालयीन वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.03.13 17:39:02 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**उदगीर.**

**ठिकाणः उदगीर**

**दिनांकः– १३/०३/२०२६**